अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, एमबीए/एमएमस, एमसीए व पीजीडीएम या पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना नियमित अभ्यासक्रम म्हणून कार्यान्वयीत करण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.टीईएम-२०२०/प्र.क्र.११७/तांशि-४
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०६ ऑक्टोबर, २०२०

<u>वाचा</u> :- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा दि.२९ जून, २०२० रोजीचा ई-मेल.

२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी /मान्यता/२०२०/५६९, दि.११ ऑगस्ट, २०२०.

**प्रस्तावना:**

संचालक, तंत्रशिक्षण यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० व तत्पुर्वी द्वितीय पाळी व अर्धवेळ अभ्यासक्रम म्हणून मान्यता दिलेल्या राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, एमबीए/एमएमस, एमसीए व पीजीडीएम या पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे निर्णयाचे आधारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नियमित अभ्यासक्रम म्हणून कार्यान्वयीत करण्यास शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० व तत्पुर्वी द्वितीय पाळी व अर्धवेळ अभ्यासक्रम म्हणून मान्यता दिलेल्या राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, एमबीए/एमएमस, एमसीए व पीजीडीएम या पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना Annexure-A व Annexure-B मध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नियमित अभ्यासक्रम म्हणून कार्यान्वयीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मान्यता कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच विभागाच्या दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता Annexure-A व Annexure-B मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील.

SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
LONAVALA 410 401

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala-410401

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१०) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२०१००६१६०८५२७३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: CN = SANJAY AUDUMBAR DHARURKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT
Date: 2020.10.08 16:14:17 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई



SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY LONAVALA 410 401

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala-410401

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा(पूर्व), मुंबई ४०००५१
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५. सर्व अकृषी विद्यापीठाचे कुलसचिव.
६. संबंधित संस्था (संचालक,तंत्रशिक्षण यांच्यामार्फत)
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
१०. कक्ष अधिकारी (तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.
११. निवड नस्ती/तांशि-४

SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY LONAVALA 410 401

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala-410401

**Document related to renewal admission capacity for the institute in AY 2020-21**

This is to declare that the document related to increase/ decrease of admission intake capacity is received from government of Maharashtra, Higher and Technical education department as per decision number TEM-2020/P.K./117/TASHI-4.

Read: 1) Email from AICTE New Delhi, Dated 29 June 2020

2) Director, Technical Education, Maharashtra State, Mumbai, letter No.2/NGC/Approval/2020/569 , Dated 11 August,2020

According to the approval from AICTE, New Delhi and proposals from Director of Technical Education, the government of Maharashtra issues GR. The GR for Academic year 2020-21 is attached. It exhibits names of the institute in Annexure"A" and Annexure "B". In this GR our institute name is at serial numbers 105 with appropriate permission for increase/decrease of admission intake is approved.

Same GR is made available on Maharashtra state government site www.maharashtra.gov.in whose code is 202010061608527308, Order is passed with digital signature.

This is the English translation of original GR in Devnagari

Document in Regional ...
Translated to Engli...

SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
LONAVALA
410 401

Dr. M. S. GAIKWAD
PRINCIPAL
Sinhgad Institute Of Technology, Lonavala

Government Resoluation No. TEM-2020/C.R. 117/TE-4, Dated : 06th October, 2020

Annexure A

List of Second Shift Courses Changed to Regular Course in existing Institutes, Approved by AICTE for A.Y. 2020-21

| Sr no | InstituteCode | Institute Name | Program | University | Level | Name of Course | Intake Approved 2nd shift in 2019-20 | Intake Approved for 2020-21 | Variation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 99 | 6177 | SINHGAD COLLEGE OF ENGINEERING | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ELECTRONICS & TELE-COMMUNICATION ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 100 | 6177 | SINHGAD COLLEGE OF ENGINEERING | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 101 | 6178 | SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF ENGINEERING | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 102 | 6178 | SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF ENGINEERING | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 120 | 120 | 0 |
| 103 | 6178 | SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF ENGINEERING | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 104 | 6182 | SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY AND SCIENCE | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 105 | 6185 | SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 106 | 6187 | SINHGAD ACADEMY OF ENGINEERING | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 107 | 6187 | SINHGAD ACADEMY OF ENGINEERING | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 108 | 6196 | RIIM-THE ACADEMY SCHOOL OF BUSINESS MANAGEMENT | MANAGEMENT | University of Pune, Pune | POST GRADUATE | MBA | 60 | 60 | 0 |
| 109 | 6207 | DR. D. Y. PATIL INSTITUTE OF TECHNOLOGY. | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 110 | 6207 | DR. D. Y. PATIL INSTITUTE OF TECHNOLOGY. | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 60 | 60 | 0 |
| 111 | 6228 | D. Y. PATIL INSTITUTE OF MASTER OF COMPUTER APPLICATIONS AND MANAGEMENT | MANAGEMENT | University of Pune, Pune | POST GRADUATE | MBA | 60 | 120 | 60 |
| 112 | 6232 | INSTITUTE OF MANAGEMENT & CAREER COURSES | MCA | University of Pune, Pune | POST GRADUATE | MASTERS IN COMPUTER APPLICATIONS | 60 | 60 | 0 |
| 113 | 6271 | SCTR'S PUNE INSTITUTE OF COMPUTER TECHNOLOGY | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 60 | 60 | 0 |

SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY LONAVALA 410 401

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala-410401